महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
CIN No.U40109MH2005SGC153646
एच.व्हि.डी.सी. ग्र.कें. (संवसु) मंडळ चंद्रपूर
294505 ( का)
Email.id-se4300@mahatransco.in
अधिक्षक अभियंता
एचव्हिडीसी ग्र.कें.(संवसु) मंडळ,
सीटीपीएस कॉम्पलेक्स चंद्रपूर.

संदर्भ :अअ / एचव्हीडीसी / ग्र.के / संवसु / मंडळ / चंद्र / मासंवि / No00800

दिनांक : 29 JUN 2021

# जाहीर सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते की, एच.व्हि.डी.सी.ग्र.कें.संवसू प्रविभाग,महापारेषण चंद्रपूर अंतर्गत वर्ष २०२१-२२ करीता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी करारबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी www.apprenticeship.gov.in या संकेत स्थळावर शिकाऊ उमेदवारी करीता दि. ३०.०६.२०२१ ते ०६.०७.२०२१ पर्यंत २३.५९ वाजेपर्यंत खालील नमुद आस्थापना नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज सादर करावे. आस्थापना नोंदणी क्रमांक व शिकाऊ उमेदवारी पदांचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | रजिस्ट्रेशन क्रमांक | विजतंत्री (Electrician) |
|---|---|---|---|
| 1 | एचव्हिडीसी ग्र.कें.संवसू प्रविभाग, चंद्रपूर | E-09162701679 | ३० |

१. **शैक्षणिक अर्हता** :-
   १ महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण
   २ राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात परीक्षा उत्तीर्ण.

२. **शैक्षणिक दस्तावेज**:- १) एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री चार सेमिस्टरचे उत्तीर्ण गुणपत्रिकाची मुळप्रत. २) आधारकार्ड ३) मागसवर्गीय विद्यार्थ्याचे जात प्रमाणपत्र ४) महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र ५) उच्च व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषंगिक आवश्यक कागदपत्रांची मुळप्रत उमेदवारांने स्वत:च्या प्रोफाईलवर स्कॅन करून अपलोड करावे.

३. **विद्यावेतन**:- प्रचलित नियमाप्रमाणे लागु राहील.

४. नमुद पद संख्या कमी - अधिक करण्याचे व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.


नोंदणीकृत कार्यालय – 'प्रकाशगंगा' – सी–19 ई ब्लॉक – कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई – 400 051
दुरध्वनी – (022) 2659 8595 / 2659 5000 फॅक्स (022) 2659 1254
D:/Marathi HR

५. भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडून दबाव आणल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियेतुन बाहेर करण्यात येईल.

६. उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करताना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करून योग्य रितीने उपलोड करणे बंधनकारक आहे. वरील कालावधील ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

७. वयोमर्यादा १८ ते ३३ वर्षे (मागासवर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथिलक्षम).

८. ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वित E-Mail Id व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक राहील.

९. शिकाऊ उमेदवारांनी निवड ही एस.एस.सी. व आय.टी.आय. गुणांच्या टक्केवारीनुसार तसेच सामाजिक आरक्षणाच्या अधिन राहुन प्रवर्गनिहाय केली जाईल.

१०. आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांस या कार्यालयाने वेळोवेळी शासनाच्या नियमाप्रमाणे आरक्षणासंबधीत कागदपत्राची मागणी केल्यास ते सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

११. प्रणाली मध्ये बदल झाल्यामुळे या आधी ज्या उमेदवारानी वरील रजिस्ट्रेशन क्रमांकावर ऑनलाईन (Online) अर्ज सादर केले असेल त्यांनी पुन्हा अर्ज सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. सदर भरती प्रक्रियेकरीता फक्त दि. ३०.०६.२०२१ ते ०६.०७.२०२१ दरम्यान ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचा विचार केला जाईल. वर नमुद दिनांकाच्या पुर्वी किंवा नंतर ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचा भरती प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही याची सुध्दा नोंद घ्यावी.

(प्रफुल्ल अवघड)
अधिक्षक अभियंता
एचव्हिडीसी ग्र.कें.संवसू प्रविभाग, चंद्रपूर



नोंदणीकृत कार्यालय – 'प्रकाशगंगा' – सी–19 ई ब्लॉक – कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई – 400 051
दुरध्वनी – (022) 2659 8595 / 2659 5000 फॅक्स (022) 2659 1254
D:/Marathi HR